# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २४/०३/२०१८

दिनांक २४/०३/२०१८ रोजी मा. प्रभारी पोलीस अधिक्षक श्री. राजा आर. साो., मा. अपर पोलीस अधीक्षक महेंद्र पंडीत सोा. यंाच्या आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील दारुबंदी पथकातील अधिकारी पोउपनि युवराज घोडके यांच्या पथकाने मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे मौजा कॉम्प्लेक्स टी पाईंट हनुमान मंदीराजवळील पानठेल्यामध्ये सट्टापट्टी मटका चालविणार नामे आनंद रामदास मोहुर्ले व प्यारेलाल भिकाजी खोब्रागडे दोघेही रा. मुरखळा यांचेवर धाड टाकून रोख रक्कम व जुगाराचे एकुण २७,१४०/- रूपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने तसेच मुख्य सट्टापट्टी मालक प्रफुल दिगांबर बिजवे रा. गडचिरोली तिन्ही आरोपी विरूध्द पोस्टे गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच मौजा आयटीआय चौकातील पानठेल्यामध्ये सट्टापट्टी मटका चालविणार नामे निखील प्रभाकर भुरसे रा. लांझेडा ता.जि. गडचिरोली याचेवर धाड टाकून रोख रक्कम व जुगाराचे एकुण ८,६७० रूपयाचा मुद्देमाल मिळून आल्याने तसेच सट्टापट्टी मालक संजय गणवेणवार रा. गडचिरोली या दोन्ही आरोपी विरूध्द पोस्टे गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच मौजा रामपुरीवार्ड येथील नवीन शासकीय महिला रूग्णालयाचे मागील बाजुस असलेल्या पानठेल्यामध्ये सट्टापट्टी मटका चालविणार नामे अनिल प्रभाकर बोदलकर रा. सर्वोदय वार्ड ता.जि. गडचिरोली याचेकडे रोख रक्कम व जुगाराचे एकुण

१२,२६०/- रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सट्टापट्टी मालक प्रफुल रामटेके रा. गडचिरोली दोन्ही आरोपी विरूध्द पोस्टे गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला.